महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर
माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये
प्राप्त झालेले व्दितीय अपील

अपील क्रमांक : ४५२/२०२१

अपिलार्थी, श्री. मेघराज बद्रीनाथ पाटील,

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक वर्ग-२,
शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद, चंद्रपूर ता. जि. चंद्रपूर

प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, चंद्रपूर ता. जि. चंद्रपूर

द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०३.०१.२०२३

अपीलकर्ता : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २१.१०.२०२० | २७.०१.२०२१ | १६.१२.२०२० | १५.०१.२०२१ |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६ (१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २१.१०.२०२० रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी " कुमारी अरुना डोमाजी शिंदे यांना दिनांक ११.०४.२००० रोजीच्या पत्राव्दारे सन १९९९-२००० सत्रात महात्मा ज्योतीबा फुले, प्राथमिक शाळा, श्यामनगर चंद्रपूर या शाळेत नियुक्त केलेल्या नियुक्तीचा कालावधी या रकान्यात असे नमुद केले आहे की, शाळा समिती ठराव क्र.२ दिनांक ३०.०५.१९९७ अन्वये, दिनांक ०१.०७.१९९८ पासुन दोन वर्षाच्या परिविक्षण कालावधीसाठी मान्यता प्रदान करण्यात येत आहे तसेच आर्थिक व प्रशासकीय अधिकार प्रदान करण्यात येत आहे असे नमुद असून आपल्या कार्यालयात उपलब्ध असलेल्या दिनांक ३०.०५.१९९७ च्या शाळा समितीच्या ठरावा ची प्रमाणीत प्रत अर्जदाराला पुरविण्याबाबत." माहिती मागितलेली आहे.

सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी विलंबाने दि. २७.०१.२०२१ रोजी कोणताही प्रतीसाद दिल्याचे दिसून येते. त्यानंतर अपिलार्थी यांनी **दिनांक १६.१२.२०२०** रोजी कलम १९ (१)

नुसार प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे "वारंवार विचारपुस करीत असता माहिती देण्यास टाळाटाळ करीत आहेत." असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी विहीत मुदतीत कोणत्याही प्रकारची सुनावणी आयोजित करून आदेश पारित केल्याचे दिसून येत नाही.

तद्नंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे दिनांक ०८.०२.२०२१ रोजी "माहीती न मिळाल्यामुळे," असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपीलावर दिनांक ०३.०१.२०२३ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती, सुनावणी दरम्यान अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. व प्रथम अपिलीय अधिकारी श्री. रिपेंद्र लोखंडे शिक्षणाधिकारी (प्राथ) जिल्हा परिषद चंद्रपूर उपस्थित आहेत.

अपीलार्थी यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपील अर्जावर आज झालेल्या सुनावणी दरम्यान सादर कागदपत्राचे अवलोकन व उपस्थितांचे युक्तिवाद विचारात घेता, प्रस्तुत प्रकरणी अपीलार्थी यांनी दाखल केलेल्या माहिती अर्जानुषंगाने तत्कालिन जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक वर्ग-२, शिक्षण विभाग (प्राथ), जिल्हा परिषद, चंद्रपूर यांनी दि. २७.०१.२०२१ रोजी मागितलेली माहिती २३ वर्षा पुर्वीची असून, सदर माहितीचा या कार्यालयात शोध घेतला असता सदर माहिती या कार्यालयात नसल्याचे दिसुन येते. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये, मूळ अर्ज कलम ६ (३) नुसार जनमाहिती अधिकारी महात्मा ज्योतीबा फुले प्राथमिक शाळा श्यामनगर, चंद्रपूर यांचेकडे हस्तांतरीत करण्यात आले असून अपिलार्थी यांना जोडपत्र-अ प्रमाणे माहिती उपलब्ध करून देण्याबाबत कळविण्यात आले. त्याविरुध्द अपिलार्थी यांनी दि. १६.१२.२०२० रोजी प्रथम अपिल अर्ज दाखल केला. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी आयोजित केल्याचे आढळून येत नाही.

श्री. पाटील यांनी दि. ३०.०५.१९९७ रोजी शाळा ठरावाची प्रमाणित प्रत तसेच दि. २४.०९.२००० रोजी संस्थेच्या ठराव क्र.३ ची प्रमाणित प्रत प्रदान करण्याची मागणी केली. त्यावर तत्कालिन प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथ.), जिल्हा परिषद, चंद्रपूर यांनी दि. १५.०१.२०२१ रोजी सुनावणी आयोजित करून जनमाहिती अधिकारी तथा मानिव जनमाहिती अधिकारी, प्राथमिक शाळा, चंद्रपूर अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती ही त्यांच्या शाळेत उपलब्ध असल्यास २ आठवडयाच्या आत अपिलार्थी यांना प्रदान करण्याचे आदेश निर्गमित केलेले आहे. मात्र अपिलार्थी यांच्या जोडपत्र-अ माहिती याआधीच प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या स्तरावरुन माहिती प्राप्त झाली असल्याचे कळविले. विद्यमान जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक वर्ग-२,शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद, चंद्रपूर ता. जि. चंद्रपूर यांनी वरील आदेशाची पूर्तता झाली आहे किंवा नाही

याची खातरजमा करून अपिलार्थी यांना माहिती प्रदान करण्याबाबत दक्षता घ्यावी, या निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

(राहुल भा.पांडे)

**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक :०३.०१.२०२३**

जावक क्रमांक 1907------------ दिनांक ----------------------------
21 MAR 2023